गोंडवाना विद्यापीठासाठी मंजूर शिक्षक व शिक्षकेतर पदांपैकी सरळसेवा कोट्यातील रिक्त असलेली पदे भरण्यास मान्यता प्रदान करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः पदभ- २०१७/प्र.क्र.३५६/१७/विशि-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ०९ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः जीयुजी-२०११/ (१०४/११)/ विशि-१, दिनांक १६ मे, २०११

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१२/ (२८९/१२)/ विशि-१, दिनांक ११ नोव्हेंबर, २०१४

३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही -२०१५/प्र.क्र.२९०/का-१२, दिनांक १६ जुलै, २०१५

४) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण २०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१ दिनांक २ जून, २०१५

५) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांकः पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आ.पु.त.क्ष., दिनांक २५ मे, २०१७.

प्रस्तावना :-

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठास संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वे दिनांक १६.०५.२०११ च्या शासन निर्णयान्वये विद्यापीठाकरिता एकूण १६० शिक्षकेत्तर पदांचा आकृतीबंध मंजूर आहे. तसेच संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये विद्यापीठासाठी एकूण ३५ शिक्षकीय पदे मंजूर करण्यात आलेली आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या संख्येत तसेच विद्यार्थी संख्येमध्ये वाढ झाल्यामुळे विद्यापीठाचे शैक्षणिक तसेच प्रशासकीय कामकाज विहित वेळेत पूर्ण करण्यास अडचणी निर्माण होत आहे. तसेच नवनिर्मित गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली स्थित असून विद्यापीठाचे कार्यक्षेत्र गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये विस्तारलेले आहे. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आदिवासी व नक्षलग्रस्त भागात असून तेथील बहुतांश भागात आदिवासी व मागासवर्गीयांचे अस्तित्व आहे. त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून अनुदान प्राप्त होण्यासाठी विद्यापीठास १२ (बी) चा दर्जा प्राप्त असणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यापीठातील किमान ५ शैक्षणिक विभाग पूर्णपणे विकसित असणे गरजेचे आहे.

संदर्भाकिंत क्र. ५ येथील शासन निर्णयानुसार सद्य:स्थितीत भरती प्रक्रियेवर निर्बंध आहे. तथापि, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठासाठी मंजूर शिक्षकीय व शिक्षकेतर पदांपैकी सरळसेवा कोट्यातील रिक्त असलेली १७ शिक्षकीय व २० शिक्षकेतर अशी एकूण ३७ पदे भरण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ०३ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १६ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये गठीत समितीपुढे एक विशेष बाब म्हणून सादर केला होता. सदर समितीने उक्त प्रस्तावास एक विशेष बाब म्हणून मान्यता दिलेली आहे.

शासन निर्णय

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार गोंडवाना विद्यापीठास मंजूर पदांपैकी रिक्त असलेली सरळसेवा कोट्यातील खालील शिक्षक व शिक्षकेतर पदे भरण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देत आहे.

शिक्षकीय संवर्ग :-

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या
१	प्राध्यापक	०५
२	सहयोगी प्राध्यापक	१०
३	सहायक प्राध्यापक	०२
एकूण		१७

शिक्षकेतर संवर्ग :-

अ.क्र	पदनाम	पदसंख्या
१	सहायक कुलसचिव	०२
२	अधिक्षक	०४
३	सांख्यिकी सहायक	०१
४	निम्न श्रेणी लिपीक	११
५	फर्रास	०१
६	उद्यानरेजा	०१
एकूण		२०

२. उपरोक्त शिक्षक-शिक्षकेतर पदांची भरती विद्यापीठ अनुदान आयोगाने व शासनाने वेळोवेळी विहित केलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता, अनुभव इ. बाबी तसेच शासनाचे प्रचलित नियम/ धोरण विचारात घेऊन विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून करावी.

३. सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५४/आ.पु.क., दि.१७.०१.२०१८ व सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १३५६/२०१७ दि. ०८.११.२०१७, क्र. १५१/२०१८, दि. ०३.०२.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संकेतांक २०१८०२१२११४१३९५३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Vijay Eknath Sable
Date: 2018.02.16 15:43:21 +05'30'

(विजय साबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. मंत्री (वित्त) मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव,
४. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,
५. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक,
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग,नागपूर,
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) नागपूर-२, महाराष्ट्र, (५ प्रती),
९. महालेखापाल (लेखा परीक्षा) नागपूर-२, महाराष्ट्र, (५ प्रती),
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर,
११. वित्त विभाग,(व्यय-५) मंत्रालय,मुंबई
१२. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१२), मंत्रालय, मुंबई,
१३. निवड नस्ती (विशि-१)